**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**

*A.Y. 2024-2025*

# ‘कोयना’च्या यशाची परंपरा कायम राहील

## अमरसिंह पाटणकर



पाटण : यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत अमरसिंह पाटणकर व प्राध्यापक.

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

स्पर्धात्मक युगात जेईई, आयआयटी तसेच वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी नीट सारख्या परीक्षांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. कोयना ॲकेडमीमधील विद्यार्थी जेईई, आयआयटी, नीटसारख्या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करीत आहेत. येथील विद्यार्थी अभियांत्रिकी, वैद्यकीय व आयआयटीला जात आहेत हे अभिमानास्पद आहे. यशाची परंपरा कायम राहील असा विश्वास कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी व्यक्त केला.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या 'कोयना ॲकेडमी' मधील विद्यार्थ्यांनी जेईई मेन्स परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले. त्यानिमित्ताने विद्यार्थी व पालक यांच्या सत्कार समारंभप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी संस्थेचे संचालक संजीव चव्हाण, प्रा.बी.एन.पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या चेतन मोरेसह ओंकार कदम, अथर्व राऊत, निखिल जाईगडे व सोहन सूर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला यावेळी चंद्रकांत मोरे, नगरसेवक संजय इंगवले, राजाभाऊ कांबळे, बाळासाहेब पवार, बळीराम सुर्वे, प्रा.सत्यजित माने उपस्थित होते. प्रा.पूनम पाटील यांनी सू त्रसंचालन केले. चंद्रशेखर ढवळे यांनी आभार मानले.